गाव तिथे प्रतिनिधी
नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १६४ वा ● शुक्रवार ०३ नोव्हेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 164 | Date : 03/11/2023 | blow :Friday | Page 4 | Price 4

मनोज जरांगे पाटलांचं उपोषण मागे, सरकारला दोन महिन्यांची मुदत

अंतरवली सराटी : मागील अनेक दिवसांपासून सुरु असलेलं मनोज जरांगे यांचं उपोषण अखेर स्थगित केलं आहे. सरकारच्या शिष्टमंडळाने भेट घेतल्यानंतर मनोज जरांगे यांनी सरकारला वेळ देण्याची तयारी दर्शवली. तर त्यांनी त्यांचं दुसऱ्या टप्प्यातील उपोषण अखेर मागे घेतलं सरकारच्या शिष्टमंडळाने अंतरवली सराटीमध्ये जाऊन मनोज जरांगे यांची भेट घेतली. २ जानेवारीपर्यंतचा वेळ मनोज जरांगे यांनी सरकारला दिला आहे. यावेळी सरसकट कुणबी प्रमाणपत्र देणार असाल तर सरकारला वेळ देण्यास तयार असल्याचं यावेळी मनोज जरांगे यांनी म्हटलं. तसेच यावेळी महाराष्ट्रातील सगळ्या मराठा बांधवांना आरक्षण मिळायला हवं असं देखील यावेळी मनोज जरांगे यांनी म्हटलं. सरकारच्या शिष्टमंडळासोबत जरांगे पाटलांची यशस्वी चर्चा झाल्याचं सांगण्यात येत आहे.

आता दिलेला वेळ हा शेवटचा आहे. त्यामुळे वेळ घ्या पण आता आरक्षण द्या, असं मनोज जरांगेंनी यावेळी म्हटलं. तसेच आता पुढच्या लढाईसाठी तयार राहण्याचं आवाहन देखील मनोज जरांगे यांनी केलं. तर जरांगे पाटलांनी २ जानेवारीची डेडलाईन सरकारला दिलीये.

२४ डिसेंबरनंतर सरकारला एकही दिवस वाढवून न देण्यास जरांगे पाटलांनी विरोध केलाय. सरकारच्या शिष्टमंडळाने २ जानेवारीपर्यंत वेळ देण्याची विनंती मनोज जरांगे यांनी केली. पण जरांगे पाटील २४ डिसेंबर या तारखेवर ठाम राहिले. त्यानंतर तारखेबाबत बराच

। पान २ वर

न्यायालयात टिकणारे मराठा आरक्षण देण्यासाठी गांभीर्याने पाऊले टाकणे सुरु : मुख्यमंत्री शिंदे

मुंबई : मनोज जरांगे पाटील यांनी आज उपोषण मागे घेतल्याचे जाहीर केले त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांना तसेच सकल मराठा समाजाला मनापासून धन्यवाद दिले आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतल्यानंतर मुख्यमंत्री पत्रकार परिषदेत बोलत होते.कायदेतज्ज्ञ एखादे उपोषण सोडवण्यासाठी प्रत्यक्ष उपोषण स्थळी जाणे ही इतिहासातली पहिला घटना असेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले. दोन महिन्यांची मुदत जरांगे पाटील यांनी दिली आहे. मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे आणि कायद्याच्या चौकटीतले आरक्षण देण्यासाठी शासन गांभीर्याने पाऊले टाकेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

येणारी दिवाळी तसेच विद्यार्थ्यांच्या परीक्षा वगैरे गोष्टी लक्षात घेऊन मी सर्व आंदोलकांना आवाहन करतो की त्यांनी आपली आंदोलने देखील आता मागे घ्यावे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.दोन महिन्यात राज्यभरातल्या कुणबी नोंदी तपासून मराठा समाजाला प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही जलद गतीने करण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकारी व प्रशासनाला देण्यात येतील तसेच खास यासाठीच अधिकारी व कर्मचारी यांची पथके तयार करण्यात येतील असेही मुख्यमंत्री म्हणाले.

आपल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री म्हणाले की, न्या मारोती गायकवाड, न्या सुनील शुक्रे, वकील हिमांशू सचदेव तसेच इतर कायदेतज्ञ हे मनोज जरांगे पाटील यांना भेटलेल्या शिष्टमंडळात होते. शिवाय माझे सहकारी संदीपान भुमरे, धनंजय मुंडे,

। पान २ वर

भारताचा श्रीलंकेवर ३०२ धावांनी विराट विजय, श्रीलंकेचा ५५ धावांत खुर्दा, शामीच्या ५ विकेट्स

मुंबई : रोहित शर्माच्या भारतीय संघानं श्रीलंकेचा ३०२ धावांनी धुव्वा उडवून, विश्र्वचषकाच्या साखळीत सलग सातवा विजय साजरा केला. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवरच्या सामन्यात भारतानं श्रीलंकेला विजयासाठी ३५८ धावांचं डोंगराएवढं मोठं आव्हान दिलं होतं. पण त्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेची अवघ्या धावांत दाणादाण उडाली. भारताच्या जसप्रीत बुमरा, मोहम्मद सिराज आणि मोहम्मद शमी या वेगवान त्रिकूटानं श्रीलंकेचा डाव धावांत गुंडाळण्यात मोलाची भूमिका बजावली. त्याआधी, भारताच्या शुभमन गिलचं शतक आठ धावांनी हुकलं. सचिन तेंडुलकरच्या ४९ शतकांच्या विक्रमाची बरोबरी साधण्याचं विराट कोहलीचं स्वप्नही १२ धावांनी भंगलं. पण त्या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी रचलेल्या १८९ धावांच्या भागिदारीच्या जोरावर भारतानं ५० षटकांत आठ बाद ३५७ धावांची मजल मारली.मुंबई येथील वानखेडे स्टेडियमवर भारतीय संघाने श्रीलंकेला अजिबात संघर्ष करण्याची संधी दिली नाही. ३५८ धावांचा बचाव करताना पहिल्या चेंडूपासूनच लंकेवर वर्चस्व गाजवले. जसप्रीत बुमराहने पहिल्याच चेंडूवर लंकेला धक्का दिला. त्यानंतर सिराज आणि शामी यांनी सावरायची संधीच दिली नाही. भारताच्या गोलंदाजांनी श्रीलंकेचा डाव अवघ्या ५५ धावांवर गुंडाळत ३०२ धावांनी विजय मिळवला. आंतरराष्ट्रीय वनडे क्रिकेटमधील हा सर्वात मोठा

। पान २ वर

नार्वेकरांसमोर शिंदे-ठाकरे गट ई मेलवरुन भिडले; पुढील सुनावणी २१ नोव्हेंबरला

मुंबई : शिवसेना आमदारांच्या अपात्रतेच्या सुनावणी पुढची सुनावणी ही २१ नोव्हेंबर रोजी होणार आहे. या प्रकरणाची कागदपत्रे ही १६ नोव्हेंबरपर्यंत सादर करावी लागणार आहेत. दीड तास झालेल्या आजच्या युक्तिवादावेळी व्हिपच्या मुद्द्यावरून ठाकरे आणि शिंदे गटाच्या वकिलांमध्ये जोरदार युक्तीवाद झाला. आमदारांना जारी करण्यात आलेला व्हिप हा ई मेलच्या माध्यमातून पाठवण्यात आल्याचा दावा ठाकरे गटाच्या वकिलांनी केला. तर तो व्हिप आपल्याला मिळालाच नसल्याने व्हिपचे उल्लंघन केलं नसल्याचं शिंदे गटाच्या वकिलांनी सांगितलं. आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्षांसमोर सुनावणी सुरु झाली आहे. या प्रकरणात शिवसेनेच्या आमदारांच्या एकूण ३४ याचिकांचे सहा गटात वर्गीकरण करण्यात आलं आहे. आज सुरू असलेल्या या सुनावणीला ठाकरे गटाचे अनिल देसाई, सुनिल प्रभू आणि अजय चौधरी सुनावणीला उपस्थित आहेत. तर शिंदे गटाचे कुणीही उपस्थित नव्हतं. त्यावेळी दोन्ही गटांमध्ये ई मेलवरच्या व्हिपवरून जोरदार युक्तिवाद झाल्याचं दिसून आलं.

शिंदे गटाच्या १६ आमदारांना ई मेलच्या माध्यमातून व्हिप बजावण्यात आला होता असा दावा ठाकरे गटाने केला. त्या संबंधित त्यांनी पुरावेही सादर केले. पण ज्यावर व्हिप पाठवण्यात आले होते ते ई मेल आपले नसल्याचा दावा शिंदे गटाच्या वकिलांनी केला. आपल्याला व्हिपच मिळाला नाही, त्यामुळे त्याचं उल्लंघन केलं असं होत नाही असं शिंदे गटाच्या वतीनं सांगण्यात आलं जर आम्ही व्हीप पाठवलेला ईमेल चुकीचा आहे तर बरोबर कुठला आहे ते

। पान २ वर

तालुक्यातील ४० हजार ६९२ जणांना मिळणार

यंदाच्या दिवाळीत'आनंदाचा शिधा'

पंढरपूर/प्रतिनिधी : गतवर्षीप्रमाणे यंदा देखील तालुक्यातील पात्र शिधापत्रिकाधारकांना शासनाच्या वतीने दिवाळीत 'आनंदाचा शिधा' दिला जाणार आहे. यामध्ये रवा, साखर, तेल, चणाडाळ, मैदा व पोहा या सहा वस्तूंचा समावेश असून, तालुक्यातील ४० हजार ६९२ इतक्या पात्र कार्डधारकांना 'आनंदाचा शिधा' मिळणार असल्याची माहिती तहसिलदार सुशील बेल्हेकर यांनी दिली.

गतवर्षी 'आनंदाचा शिधा' या संचात रवा, चनाडाळ, साखर आणि खाद्यतेल असे ४ जिन्नस होते. मात्र आता यामध्ये दोन जिन्नसांची म्हणजेच मैदा आणि पोहा यांची भर पडली आहे. अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेद्वारे शिधापत्रिकाधारकांना दिवाळीनिमित्त एक किलो साखर, एक लिटर तेल, प्रत्येकी अर्धा किलो रवा, चणाडाळ, मैदा व पोहा असे सहा शिधा जिन्नस समाविष्ट असलेला 'आनंदाचा शिधा' हा प्रतिसंच १०० रुपये दरात ई- पॉस

। पान २ वर

रे नगर येथील पहिल्या टप्प्यातील पंधरा हजार घरकुले नोव्हेंबर अखेरपर्यंत पूर्ण करावीत :जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

आज आखेर रे नगर येथील पहिल्या टप्प्यातील १४ हजार ३०० घरकुलांचे काम पूर्ण

सोलापूर/प्रतिनिधी : प्रधानमंत्री घरकुल आवास योजने अंतर्गत रेनगर येथील पहिल्या टप्प्यातील पंधरा हजार घरकुलांचे काम माहे नोव्हेंबर २०२३ अखेर पर्यंत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी अधिक गतीने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित रेनगर येथील घरकुल कामांचा साप्ताहिक आढावा प्रसंगी जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले, प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रसाद मिरकले, कार्यकारी अभियंता श्री. पाटील यांच्यासह अन्य संबंधित अधिकारी व रे नगर हाऊसिंग सोसायटीचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेअंतर्गत रे नगर येथे पात्र लाभार्थ्यांसाठी ३० हजार घरकुले बांधण्याचा उपक्रम केंद्र व राज्य शासनाच्या वतीने मंजूर करण्यात आलेला आहे. यातील पहिल्या टप्प्यातील पंधरा हजार घरकुलांपैकी १४ हजार ३०० घरकुलांचे काम पूर्ण झालेले आहे. तरी उर्वरित सातशे घरकुलांचे काम प्रगतीपथावर असून सर्व संबंधित यंत्रणांनी हे काम माहे नोव्हेंबर २०२३ अखेर पर्यंत पूर्ण करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

रे नगर येथील पहिल्या टप्प्यांच्या १५ हजार घरकुलांचे वितरण लाभार्थ्यांना प्रधानमंत्री यांच्या हस्ते करण्याचे नियोजित असून त्या अनुषंगाने सर्व संबंधित

। पान २ वर

दैनिक
यश सिद्धी न्यूज
● संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे मो.9921988358 ●

सुवर्णसंधी

लेखक/कवि/साहित्यक/विचावंत यांना सुवर्णसंधी
दैनिक यशसिध्दी न्यूज या वृत्तपत्राच्या
दिवाळी विशेषांकामध्ये
आपले लेख/कविता/इतर साहित्य प्रकाशनासाठी
संपर्क मो.९९२१९८८३५८ साधावा.

: संपादक :
कमलाकर सोनकांबळे

www.yashsiddhinews.com
Epepar-yashsiddhinews.com
टिप : दिवाळी अंक हा पुस्तक स्वरुपात असेल...

तोंडे बघून तालुके दुष्काळ जाहीर करू नका अन्यथा आंदोलन : माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे

अक्कलकोट/प्रतिनिधीः राज्य शासनाच्या पहिल्या टप्प्यातील दुष्काळी यादीत अक्कलकोट तालुक्याला वगळले आहे. तोंडे बघून तालुके दुष्काळ जाहीर करू नका अन्यथा आम्हाला मराठा आंदोलनापेक्षाही उग्र आंदोलन करावे लागेल,असा इशारा माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी गुरुवारी प्रशासनाला दिला. तालुका दुष्काळी यादीतून वगळल्यानंतर माजी मंत्री म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले. यावेळी तालुक्याला कोणत्या निकषाद्वारे वगळण्यात आले, त्याचे निकष काय आहेत आणि हा तालुका दुष्काळामध्ये कसा बसतो हे म्हेत्रे यांनी प्रशासनाला पटवून दिले. यावर्षी पावसाच्या अवकृपेमुळे तालुक्यातील शेतकरी पुर्णतः अडचणीत आला आहे. हातची गेलेली खरीपाची पिके, रब्बीसाठी भविष्यातील अडचण, तालुक्यातील तलाव, नद्या, नाले, लघु व मध्यम प्रकल्पात पाण्याचा एकही

थेंबही नसल्याने आतापासूनच सर्रास सगळ्या गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या हळुहळू डोकेवर काढत आहे. कर्जाच्या डोंगराखाली दबलेल्या शेतकरी कुटुंबांना यावर्षीच्या अत्यल्प पावसामुळे मोठ्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे. ही वस्तुस्थिती असताना अक्कलकोट तालुक्याचा दुष्काळी यादीत नाव असणे आवश्यक होते. परंतु दुष्काळी यादीत नाव न आल्याने आमच्या अडचणीत मोठी भर पडली आहे.आमच्या तालुक्याचा दुष्काळी यादीत सहभाग व्हावा व दुष्काळाचे सर्व सवलती लागु कराव्यात. अत्यल्प पावसामुळे आतापासूनच चाराटंचाई सुरु झाली आहे. प्राप्त परिस्थिती लक्षात घेता प्रत्येक जिल्हा परिषद गटात चारा छावण्या सुरू करण्यात याव्यात.मागील अनेक वर्षांपासून उजनीचे पाणी एकरुखच्या योजनेतुन कुरनूर धरणात सोडण्यासंदर्भात पाठपुरावा सुरू आहे.सद्यस्थितीत उजनी धरणात ६० टक्क्यांहून अधिक पाणी आहे. प्राप्त परिस्थिती लक्षात घेता उजनीचे पाणी कुरनूर धरणात सोडता येते,यासाठी जिल्हाधिकारी यांनी आमच्या पत्राचा सहानुभूतीपूर्वक विचार करून संबंधित विभागाकडे तात्काळ कार्यवाही करण्यासंदर्भात आदेश दिले असतानाही अद्यापही पाणी सोडण्यात आले नाही. तरी आमच्या हक्काचे असलेले उजनी धरणातील पाणी तात्काळ सोडण्यासाठी आवश्यक कार्यवाही होण्याकामी पुन्हा आदेश देण्यात यावेत. खरीपातील सर्व पिकांचे अत्यल्प पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.उत्पादन घटले असून आर्थिक अडचणींचा विचार करता दिवाळीपूर्वी पीक विम्याचा अग्रीम रक्कम सरसकट मिळण्यासाठी आपल्या स्तरावरून आवश्यक कार्यवाही व्हावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य मल्लिकार्जुन पाटील,कॉंग्रेसचे शहराध्यक्ष रईस टिनवाला,सिध्दार्थ गायकवाड, मल्लिनाथ भासगी,सुनिल खवळे,नितीन ननवरे,बाबासाहेब पाटील,विकास मोरे, मुबारक कोरबु,सायबु गायकवाड, राजकुमार लकाबशेट्टी,रवि वरनाळे, दिलीप काजळे,शिवराज पोमाजी , शिवानंद बिराजदार,पंडित बिराजदार, विनीत पाटील,बसवराज मोरे, प्रकाश दुपारगुडे,बसवराज अल्लोळी,इरण्णा धसाडे,अलिबाशा अत्तार,कुमार गद्दी, नागेश बिराजदार,सरफराज शेख, बालाजी शापवाले,आझम शेख,विश्र्वनाथ हडलगी,महादेव चुंगी आदींसह कॉंग्रेस कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> आमदारांच्या कार्यालयासमोर आंदोलन करू
>
> सरकार दुष्काळाकडे गांभीर्याने पाहायला तयार नाही. दुसऱ्या टप्प्यात तालुका दुष्काळ जाहीर नाही झाला तर आमदारांच्या कार्यालयासमोर आंदोलन करावे लागेल. अक्कलकोट तालुका हा पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे याचा विचार गांभीर्याने करण्याची गरज आहे.अन्यथा आम्हाला देखील आता आंदोलन हातात घेतल्याशिवाय पर्याय नाही.
>
> **-मल्लिकार्जुन पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य**

✻ सुविचार ✻

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
– स्वामी विवेकानंद

संपादकीय

विश्वासार्हतेवर शंका..

विरोधी पक्षातील जवळपास सर्वच महत्त्वाच्या नेत्यांच्या फोनचे टॅपिंग केले जात असल्याचे एक सनसनाटी प्रकरण अलीकडे उघडकीला आले आहे. सरकार विरोधकांच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवून असल्याचे आणि ते यासाठी गैरमार्गाचा वापर करीत असल्याचे यानिमित्ताने पुन्हा एकदा समोर आल्याने हा एक गंभीर मामला ठरला आहे. या आधी पेगाससचा एक मामला असाच समोर आला होता. इस्रायलकडून घेण्यात आलेल्या या अत्यंत प्रभावशाली सॉफ्टवेअरचा वापर करून राहुल गांधी आणि अन्य लोकांची हेरगिरी केली जात असल्याची बाब मध्यंतरी बरीच चर्चेत आली होती. पण हे प्रकरण नीटपणे अंतापर्यंत गेलेले दिसले नाही. त्यातच आता हा नवीन प्रकार उघडकीला आल्यानंतर देशाच्या राजकारणाने कोणती पातळी गाठली आहे याचे विदारक दर्शन होत आहे. इंडिया आघाडीतील शशी थरूर, के. सी. वेणुगोपाल, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे, आम आदमी पक्षाचे राघव चड्ढा, मार्क्सवादी पक्षाचे सीताराम येचुरी, समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांच्यासह सर्व महत्त्वाच्या नेत्यांचे फोन सरकारच्या रडारवर होते, असा आरोप या नेत्यांनी केला आहे. या नेत्यांना ॲपल कंपनीने त्यांच्या आयफोनवर हे घुसखोरीच्या ॲलर्टचे संदेश दिले. तसेच ॲपल कंपनीने स्वतंत्रपणे या नेत्यांना ई–मेल करून त्यांना याची कल्पना दिली आहे. या प्रकाराने सरकारला नेमके काय साधायचे होते याचा अंदाज बांधता येऊ शकतो. विरोधी पक्षनेत्यांच्या फोनवरून घुसखोरी करणारे हे हल्लेखोर सरकार प्रायोजित आहेत असे ॲपल कंपनीने स्पष्टपणे म्हटले आहे त्यामुळे हा मामला अत्यंत गंभीर बनला आहे. प्रथेनुसार काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी याविषयी माहिती देणारी पत्रकार परिषद घेतल्यानंतर भाजपनेही आपली यंत्रणा या प्रकाराचा इन्कार करण्याच्या कामी मैदानात उतरवली. विरोधकांची मुस्कटदाबी हा निकोप लोकशाहीचा मार्ग नाही. सध्या केंद्रीय यंत्रणांचा वापर करून विरोधकांवर दहशत बसवली जात आहे. ईडी, सीबीआय अशा सगळ्या यंत्रणा विरोधकांना अडकवण्यासाठी अहोरात्र कामाला लागल्या आहेत. त्यातच आता हे नवीन प्रकरण समोर आल्याने सरकारच्या विश्वासार्हतेवर शंका उपस्थित होत आहे.

आता तरी लोकप्रतिनिधी निवडून द्यावे

भारतीय लोकशाही जगात सर्वश्रेष्ठ आहे. भारतीय लोकशाही खऱ्या अर्थाने जनमानसात रूजली असती तर आज देश महासत्ता असता. परंतु हजारो वर्षांपासून विषमता निर्माण करून माणसाला प्राण्यापेक्षा हीन मानणाऱ्या किळसवाण्या संस्कृती चे जतन येथे केले गेले. आणि विषमता, पाखंड, थोतांड, अंधविश्र्वास जोपासून माणसाला जे लोक माणुस माणत नव्हते अशा लोकांनी स्वतः ला श्रेष्ठ समजून घेऊन इतरांना माणसिक गुलाम करून हक्क अधिकारापासून व सर्वांगीण विकासासापासून दुर केले. जेथे माणसाला माणसा जवळ येऊ दिले जात नव्हते, माणसाला पाणी पिऊ देत नव्हते, माणसाच्या सावलीचा विटाळ व्हायचा, जेथे स्त्रियांना कमी लेखून बंधनात अडकले होते, जेथे शेती करणाऱ्यांना तुच्छ लेखले जायचे, शिक्षण नाकारले जायचे अशी व्यवस्था येथे प्रस्थापित असताता देशात समता प्रस्थापित करणे हे कल्पना शक्तीच्या बाहेरचे होते. परंतु बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना संविधान लिहण्याची संधी मिळाली आणि बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या ज्ञानाच्या जोरावर या संधीच सोनं करून देशातील प्रत्येक व्यक्तीला समान स्थान, समान हक्क, समान सन्मान देऊन हजारो वर्षांपासून चालत आलेली व्यवस्था उलथून टाकली. आणि देशाला जगातील सर्वश्रेष्ठ असे संविधान निर्माण करून प्रत्येक माणसाला विकासाचे व मानासन्माने रस्ते मोकळे करून दिले. संविधान रुपाने समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य हे कागदोपत्री देशात लागु झाले परंतु लोकांच्या डोक्यातील विषमतेची घाण तशीच होती. दुसरी गोष्ट म्हणजे विषमता, अंधविश्र्वास, पाखंड, थोतांड यावर ज्यांचे पोट भरले जात होते व ज्यांनी माणसाच्या सावलीचा विटाळ होतो ही निच शिकवण समाजात पेरली अशा लोकांसाठी संविधानाने अंकुशाचे काम केले. म्हणून निच माणसिकतेच्या लोकांनी जातीयतेचा आधार घेऊन संविधान सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहचूच दिले नाही. आणि काही लोकांनी संविधानाची चुकिची मांडणी करून सर्वश्रेष्ठ संविधानाला दोष द्यायला सुरुवात केली. परंतु समता व सामाजिक न्यायाच्या दृष्टीने विचार केला तर संविधानाने कोणत्याही लहानातील लहान घटकांवर देखील अन्याय होऊ दिला नाही. आणि भविष्यात देखील होऊ नये म्हणून लोकांनी लोकांचे प्रतिनिधी निवडून द्यावे व लोकप्रतिनिधी मार्फत लोकांनी लोकांच्या समस्या सोडवून आपला सर्वांगीण विकास करून घ्यावा अशी सोय करून दिली. परंतु निवडणुकीच्या माध्यमातून देशात लोकप्रतिनिधी निवडले गेले नाही तर जाती धर्माचे व पक्षाचे प्रतिनिधी निवडून देण्यावर भर देण्यात आला. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून संविधान न वाचणाऱ्यांची संख्या खुप आहे. विसमतेच्या जोरावर स्वतः चे पोट भरणारे लोक आता निवडून आलेल्या लोकांच्या जोरावर स्वतः ची मुळ व्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करू पाहत आहेत. आज आपण निवडणूकीच्या माध्यमातून जे उमेदवार निवडून देतो ते आपले नसतात च. ते पक्षाचे असतात. आणि देशातील राजकीय पक्षाकडे न्यायीक दृष्टिकोन व जनकल्याण नसल्याने जाती धर्माचा आधार घेऊन उमेदवार निवडून आणले जातात मुळात हेच लोकशाही साठी घातक आहे. आणि आजपर्यंत आपण जातीधर्माचा उमेदवार बघून उमेदवारांना निवडून दिले म्हणून लोकांच्या समस्या वाढल्या जर खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी निवडून दिले असते तर आज लोकांच्या समस्या राहील्या नसत्या. आज शिक्षण, आरोग्य, रोजगार, महागाई या समस्यांनी देशात घुमाकुळ घालून सर्वसामान्य लोकांचे जिवन अवघड करून टाकले आहे. ज्यांना आपण आपल्या सेवेसाठी, आपल्या कामासाठी निवडून दिले त्यांनी स्वतः ची घरे भरून राजकीय पक्षाच्या बाजूने उभे राहले. जे लोकांच्या बाजुने उभे न राहता पक्षाच्या बाजुने उभे राहतात ते लोकप्रतिनीधी कसे? असा प्रश्र्न ही आमच्या डोक्यात येत नाही कारण निवडून देतांना च आपण जात धर्म बघून निवडून दिलेला असतो. लोकशाही मध्ये मताधिकार हा असा अधिकार आहे जेथे सरकार मध्ये कोण असेल आणि कोण नसेल हे फक्त जनताच ठरवु शकते. मग एकीकडे सर्वकाही जनता ठरवते आणि जनतेच्याच समस्या का सुटत नाहीत तर जनता जेव्हा उमेदवार निवडून देते तेव्हा तो आपल्या जातीचा धर्माचा आहे का याचा विचार करून निवडून देतात. शिक्षण, रोजगार, आरोग्य, हक्क अधिकार यावर काम करणाऱ्यांना जनता प्राधान्य देत नाही म्हणून या समस्या वाढत आहेत. जाती धर्माचे लोक निवडून देऊन बऱ्याच लोकांना आपल्या जातीचे लोक तेथे आहेत म्हणून समाधान वाटते. परंतु लोकांनी मत जरी जात बघून दिले असेल पण निवडून आल्यावर ते जातीच्या लोकांचे पण काम करत नाहीत. उदाहरण जरी बघायचे झाले तर सध्या मराठा आरक्षणासाठी महाराष्ट्र भर आंदोलन होत आहेत. आमदार खासदार जातीने मराठा अनेक आहेत. जनता मराठा आरक्षणाची मागणी करत असताना या आमदार खासदार यांनी जनतेच्या बाजूने उभे राहणे आवश्यक असते. कारण जनतेने निवडून दिलेले आहे. परंतु हे मराठा आरक्षणासाठी जनतेच्या बाजूने न बोलता गप्प आहेत तर काही लोक राजकीय पक्षाची हमाली करताना दिसत आहेत. खरंच हे लोक मराठा समाजाचे प्रतिनिधी असते तर थोड तरी बोलले असते. दुसरी गोष्ट राजकीय नेते धार्मिक दंगली सदृश्य परिस्थिती निर्माण करून देतात मग तेथे धार्मिक दंगली होतात. दंगली झाल्यावर जे नेते दंगली साठी कारणीभूत आहेत ते तर गायब होतात पण आपल्याच धर्मातील तरुण धर्मासाठी रस्त्यावर उतरले, आणि पोलिसांकडून गुन्हे दाखल होत आहेत म्हणून जमानत घेण्यासाठी एकही आमदार खासदार समोर येत नाही अथवा धार्मिक दंगली मध्ये तरुणांना जमानत मिळाली म्हणून वकिलांची टिम तयार करत नाहीत. आपण सध्य परिस्थिती पाहली तर मराठा हेच कुणबी आहेत हे कोणीच नाकारू शकत नाही. कुणबी यांना ओबीसी मध्ये आरक्षण आहे. मराठा आरक्षणाच्या माध्यमातून ज्या मराठ्यांच्या कागदपत्रावर मराठा आहे त्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यावे एवढी साधी मागणी आहे. नविन काहीच नाही. जे आहे तेच द्यायचे आहे. पण या साठी मोठ्या संख्येने मराठा आमदार खासदार असताना ही ते बाजु उचलून धरत नाहीत. म्हणजे ते जातीने जरी मराठा असतील तरीही ते प्रतिनिधी मराठ्यांचे नाहीत. असते तर काहीतरी बोलले असते. हि परिस्थिती सर्वत्रच आहे फक्त मराठा आरक्षण प्रश्र्न ज्वलंत आहे म्हणून उदाहरण घेतले आहे. बर हे मराठा आरक्षणावर एकही शब्द बोलत नाहीत पण कुणब्यांना कुणब्याचेच प्रमाणपत्र मिळावे म्हणून आंदोलन करणाऱ्या तरुणांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हे आमदार खासदार मराठा तरुणांवर गुन्हे दाखल करू नका एवढेही बोलायला तयार नसतील तर हे लोकांचे प्रतिनिधी नाहीत हेच सिद्ध होते. लोकप्रतिनिधी म्हणजे आपल्या मतदार संघातील प्रत्येक माणसाच्या समस्या लक्षात घेऊन वेळोवेळी त्या सभागृहात मांडून त्यावर तोडगा काढणारा व्यक्ती होय. आपल्या मतदार संघात शिक्षण, आरोग्य, रोजगार यांच्या सुविधा लोकांसाठी निर्माण करून वेळोवेळी पाठपुरावा करणारा होय. लोकप्रतिनिधी म्हणजे मतदार संघातील काही जनतेचा पालक असतो, लोकप्रतिनिधी राजकीय पक्षांच्या बाजुने नव्हे तर लोकांच्या बाजूने उभा राहतो. लोकप्रतिनिधी जात धर्म यावरून लोकांकडे जात नाहीत नसतो तर कर्म बघून लोक निवडून देत असतात. आज पर्यंत आपल्याला लोकशाही व लोकप्रतिनिधी यांची यांचे महत्त्व कळाले नाही. परंतु महाराष्ट्र पेटवायला मजबुर करायला लावणाऱ्यांना सत्तेतून बाहेर काढून लोकांचे कामे करणारे खरे लोकप्रतिनिधी सभागृहात व सत्तेत जाने आवश्यक आहे तरच लोकांच्या समस्या दुर होतील. काम करणारा व्यक्ती मग तो कोणत्याही जाती धर्माचा असो तो जोपर्यंत निवडून येणार नाही तोपर्यंत लोकांच्या समस्या सभागृहात जाणार नाहीत. आणि ज्या दिवशी खऱ्या अर्थाने जात धर्म न बघता कर्म बघुन उमेदवार निवडला जाईल त्या दिवशी लोकांच्या समस्या सुटलेल्या असतील व लोकांची खऱ्या अर्थाने प्रगती व्हायला सुरवात होईल. आणि जनता मताधिकारा मुळे सर्व काही करू शकते हे जेवढे खरे आहे तेवढेच खरे हे ही आहे की ईव्हीएम मुळे मताची किंमत शुन्य झाली. आणि किंमत शुन्य झाल्यामुळे हे लोक लोकांच्या समस्येवर लक्ष न देता स्वतः चे घर भरून राजकीय पक्षाची लाचारी करतात. म्हणून एक लढा ईव्हीएम हटवू पेपर निवडून घेण्यासाठी होणे आवश्यक आहे. जर पेपरवर निवडून झाली तर लोकांच्या समस्या दुर होऊन खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी निवडून यायला सुरवात होईल. परंतु एक गोष्ट विसरून चालणार नाही ती म्हणजे मत हे जात धर्म बघुन नाही तर कर्म बघून दिले तरच खरे लोकप्रतिनिधी निवडून येतील.

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान,रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

पान १ वरुन

मनोज जरांगे पाटलांचं उपोषण

वेळ चर्चा देखील करण्यात आली.

सरकारकडून गेलेल्या शिष्टमंडळाला मोठं यश आलं. कारण २५ ऑक्टोबरपासून सुरु असलेलं जरांगे पाटलांचं उपोषण त्यांनी अखेर मागे घेतलं. दरम्यान त्यांनी सरकारला दोन महिन्यांची मुदत देखील यावेळी दिली. सरकारला मुदत देण्याच्या कालावधी वरुन प्रदीर्घ काळ चर्चा सुरु होती. पण जरांगे पाटील हे त्यांच्या भूमिकेवरही ठाम होते.

मनोज जरांगे यांच्या भेटीसाठी राज्य सरकारचं शिष्टमंडळ जालन्यात गेलं. त्यावेळी शिष्टमंडळाने या प्रश्र्नी घाई गडबड न करता टिकणारं आरक्षण देण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचं सांगितलं. तसेच मराठा आरक्षणाच्या प्रश्र्नी ८ डिसेंबर रोजी विशेष अधिवेशन घेणार असल्याचंही आश्र्वासन दिलं. जरांगे पाटलांच्या दुसऱ्या टप्प्यातील उपोषणानंतर राज्यात अनेक ठिकाणी आंदोलनाला हिंसक वळण आल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा देखील प्रश्र्न निर्माण झाला. त्यामुळे सरकारचं शिष्टमंडळ हे जरांगे पाटलांची भेट घेण्यासाठी अंतरवली सराटीमध्ये दाखल झाले. यावेळी त्यांनी मनोज जरांगे यांच्याशी चर्चा करुन त्यांचं उपोषण सोडलं.

न्यायालयात टिकणारे मराठा ..

अतुल सावे, उदय सामंत, बच्चू कडू, नारायण कुचे यांनी देखील हे उपोषण सोडण्यासाठी जरांगे पाटील यांच्याशी बोलणी केली.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, मी परवा जरांगे यांच्याशी बोललो होतो. त्यांना मी सांगितलं होतं की टिकणारे, कायद्याच्या चौकटीतले आरक्षण देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. कुणबी नोंदी सापडताहेत त्यांना तपासून आपण लगेच प्रमाणपत्र देणे सुरु केले आहे. आजपर्यंत १३ हजार ५१४ नोंदी सापडल्या आहेत ही मोठी गोष्ट आहे. न्या शिंदे समितीने दिवसरात्र काम केले. समितीने मुदत मागितली हे देखील मी जरांगे पाटील यांना सांगितले आहे.. मी तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ठरवले होतेच की यासंदर्भात चर्चेतून व संवादातून हा प्रश्र्न सोडवायचा.

मुख्यमंत्री म्हणाले की, न्या शिंदे समितीला अधिक सक्षम करण्यात येईल. मनुष्यबळ देण्यात येईल. यंत्रणा वाढवून देण्यात येईल. कुणबी प्रमाणपत्रे देण्याची अंमलबजावणी वेगाने करण्यात येईल. सरकार म्हणून मराठाच नाही तर इतर कुठल्याही समाजाची फसवणूक आम्ही करणार नाही. इतर समाजावर सुद्धा अन्याय होऊ देण्यात येणार नाही.सर्वोच्च न्यायालयातल्या क्युरेटिव्ह याचिकेवर पण आपण काम करतो आहोत. सर्वोच्च न्यायालयाने पूर्वी मराठा आरक्षण रद्द करतेवेळी जे निरीक्षण नोंदवले होते ते विचारात घेऊन राज्य शासनाने काल स्थापन केलेली न्यायाधीशांची समिती शासनाला आणि आयोगाला मार्गदर्शन करते आहे. मराठा समाज मागस कसा हे पाहण्याचे काम मागासवर्ग आयोगाच्या माध्यमातून करण्यात येईल. कायद्याच्या चौकटीतले टिकणारे आरक्षण मराठा समाजाला देण्यासाठी अतिशय गांभीर्याने काम करेल असेही ते म्हणाले

भारताचा श्रीलंकेवर ३०२ धावांनी

विजय ठरला.शामी–सिराज आणि बुमराहच्या माऱ्यापुढे लंकेच्या फलंदाजांनी लोटांगण घातले. लंकेचे पाच फलंदाज खातेही न उघडता तंबूत परतले. कर्णधार कुसल मेंडिस फक्त एका धावेवर बाद झाला. त्यानंतर अंझलो मॅथ्यूज याने १२ धावा केल्या. २९ धावांत लंकेचे आठ फलंदाज तंबूत परतले होते. महिश तिक्ष्णा आणि रजिथा यांनी अखेरीस थोड्याफार धावा केल्यामुळे ५० लंकेनं ५० धावसंख्या ओलांडली. तिक्ष्णा १२ धावांवर नाबाद राहिला. तर रजिथा याने १४ धावा केल्या. मधुशंका पाच धावांवर बाद झाला.

भारताकडून मोहम्मद शामीने याने पुन्हा एकदा पाच विकेट घेतल्या. पाच षटकात फक्त १८ धावा खर्च करत त्याने पाच फलंदाजांना तंबूत धाडले. सिराजनेही सात षटकात १६ धावा खर्च करत तीन विकेट्स घेतल्या. जसप्रीत बुमराह आणि रविंद्र जाडेजा यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली.

सेमीफायनलमध्ये प्रवेश – वानखेडेच्या मैदानावर श्रीलंकेचा पराभव करत भारताने विश्र्वचषकाच्या सेमीफायनलमध्ये प्रवेश केला. भारताचा हा सलग सातवा विजय होय. यंदाच्या विश्र्वचषकात सेमीफायनलमध्ये पोहचणारा भारत पहिला संघ आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वातील टीम इंडियाने आपला फॉर्म कायम राखत विजय नोंदवला. भारतीय संघाने गुणतालिकेत पुन्हा एकदा अव्वल स्थान काबिज केलेय.

नार्वेकरांसमोर शिंदे–ठाकरे गट

त्यांनी सांगावं. आयटी कायद्यानुसार ईमेल हा पुरावा म्हणून ग्राह्य धरला जातो. शिंदे गटाचे आमदार महेश शिंदे यांना स्पेशल ईमेल आयडी मिळाला आहे का? महेश शिंदे यांनी maheshshinde0003 असा मेल आयडी दिलाय. हा कुठला आयडी आहे? तुम्ही म्हणता ईमेल दिला आहे पण ते म्हणतात तसं चुकीच्या ईमेलला जर दिला असेल तर त्याला उत्तर काय असा सवाल राहुल नार्वेकरांनी ठाकरे गटाच्या वकिलांना दिला.

त्यावर ठाकरे गटाकडून युक्तिवाद करताना सांगितलं की, जर आम्ही व्हिप पाठवलेला ईमेल चुकीचा आहे तर बरोबर कुठला आहे ते त्यांनी सांगावं.

या प्रकरणात नव्याने पुरावे सादर करण्याची गरज नाही. गेल्या सुनावणीत आपण अर्ज दाखल केला होता. जे पुरावे सर्वोच्च न्यायालयात सादर केले आहेत. त्याला माझा विरोध नाही. सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे सुनावणी घ्यावी.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले की, मला मर्यादित वेळेत ही सुनावणी घ्यायची आहे. दोन्ही गटाच्या वकिलांकडून गोंधळ घालण्याचा प्रयत्न होतोय. २५ सप्टेंबर च्या निर्णयानुसार पुरावे सादर करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यानंतर २८ ऑक्टोबरला अर्ज दाखल केले. पण अर्ज फेटाळण्यात आला. त्यानंतर व्हिपसंदर्भात प्रश्र्न निर्माण केला. शिंदे गटाने मेल मिळालाच नाही असे सांगितले. गेल्यावेळी मी सांगितले होते की पुरावे सादर करावेत, पण अद्याप अर्जावर सुनावणी सुरु आहे. जर मी पुरावे सादर करू नका म्हटले तर मला सादर करण्यास मिळणार नाहीत. याउलट त्यांना परवानगी मिळू शकते.

विधानसभा अध्यक्ष दोन्ही गटाच्या सहमतीने पुरावे सादर करण्यास परवानगी देत आहे. तसेच फेरसाक्ष घेण्याचा निर्णय घेत आहे. दोन्ही गटाच्या वकिलांकडून सहमती आहे. अर्ज मंजुरी काढण्यात येत आहे. वेळेची बचत करण्यासाठी दोन्ही गटांची मंजुरी आहे.

यंदाच्या दिवाळीत‘आनंदाचा शिधा’

प्रणालीद्वारे वितरित करण्यात येणार आहे. हा शिधा तालुक्यातील ४० हजार ६९२ इतक्या पात्र कार्डधारकांना सवलतीच्या दरात दिपावलीसणा अगोदर वाटप केला जाणार असल्याचे तहसिलदार बेल्हेकर यांनी सांगितले.तालुक्यातील १४६ रास्त भाव धान्य दुकानदारांकडून मोफत धान्य वाटप करण्यात येणार असून, रास्त भाव धान्य दुकानदारांकडून पात्र शिधापत्रिकाधारकांना योग्य पध्दतीने ’आनंदाचा शिधा ’ वाटप करण्यात येणार असल्याचे पुरवठा निरिक्षक सदानंद नाईक यांनी सांगितले आहे.

रे नगर येथील पहिल्या टप्प्यातील पंधरा

यंत्रणांनी त्यांच्याकडील प्रगतीपथावर असलेली सर्व कामे त्वरित पूर्ण करावीत. या भागातील मराठी व उर्दू शाळेचे प्रस्ताव शासनाने त्वरित मंजूर करावेत, यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने सातत्याने पाठपुरावा करावा. तसेच रे नगर येथील ४० अंगणवाड्यांना मान्यता दिलेली असून त्यातील २६ अंगणवाड्यांचे स्लॅब ची कामे पूर्ण झालेली असून उर्वरित अंगणवाडीची कामेही पूर्ण करून घ्यावेत. सांडपाणी पुनर्वापर प्रकल्प व पाणी प्रक्रिया प्रकल्प अधिकारी वेगाने पूर्ण करून घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले यांनी रे नगर येथील पहिल्या टप्प्यातील १४३०० घरकुलांचे काम पूर्ण झालेले असून यापैकी १२००० घरकुलांचे २१६ कोटींचे कर्ज वितरण बँकांनी केले आहे असे सांगितले. यावेळी रेनगर हाऊसिंग सोसायटीचे प्रतिनिधी यांनी वैयक्तिक वीज जोडणीची रक्कम अधिक असल्याची तसेच अन्य पायाभूत सुविधाच्या अनुषंगाने लवकर कामे पूर्ण करण्याची मागणी केली.

पुस्तकाचे गाव’ योजनेचा विस्तार करून वाचकांसाठी दर्जेदार पुस्तके उपलब्ध करून द्यावीत : मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर

मुंबई : राज्यात वाचन संस्कृती वाढावी, मराठी भाषेचा प्रचार प्रसार व्हावा यादृष्टीने पुस्तकाचे गाव योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा टप्प्या–टप्प्याने विस्तार करण्यात येत असून नव्याने विकसित करण्यात येणाऱ्या चार गावांमध्ये वाचकांना दर्जेदार पुस्तके उपलब्ध करून द्यावीत, असे निर्देश मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी दिले.

या अनुषंगाने आयोजित बैठकीत मराठी भाषा विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, उपसचिव हर्षवर्धन जाधव, अवर सचिव अजय भोसले, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे आदी उपस्थित होते.छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरूळ, गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव बांध, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पोंभूर्ले आणि सांगली जिल्ह्यातील अंकलखोप (औदुंबर) येथे

पुस्तकांचे गाव योजनेचा विस्तार करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या गावांमध्ये विविध साहित्य प्रकारांची विभागणी करून १० दालने तयार करण्यात यावीत. या दालनांमध्ये वाचकांना सर्व प्रकारची दर्जेदार पुस्तके उपलब्ध करून द्यावीत. तसेच त्यातील एका दालनात मराठी भाषा विभागाची विविध प्रकाशने उपलब्ध असावीत, असे निर्देश मंत्री श्री. केसरकर यांनी दिले. येथे पर्यटक सुद्धा आकर्षित व्हावेत यासाठी गावामध्ये भिंती रंगवून वातावरण निर्मिती करण्यात यावी, अशी सूचनाही त्यांनी केली. या दालनांसाठी प्रत्येकी एक हजार दर्जेदार पुस्तकांची यादी तयार करण्याचे निर्देश त्यांनी राज्य मराठी विकास संस्थेस दिले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

कौशल्य आधारित विविध अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना रोजगार मिळाला पाहिजे : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

✻अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाकडून ५९४३ लाभार्थ्यांना व्याज परतव्याचा लाभ झाला ✻मंडळाच्या योजनांच्या लाभार्थ्यांची संख्या वाढवण्यासाठी स्वतंत्र बैठकीचे आयोजन करावे ✻अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाने कौशल्य विकास अंतर्गत करार करण्यासाठी १५ दिवसात प्रस्ताव पाठवावा ✻उद्योजकाच्या मागणीनुसार कौशल्य विकास अंतर्गत डिजिटल मार्केटिंग चा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रयत्न करणार

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यात कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता केंद्रामार्फत विविध संस्थांना कौशल्य आधारित अभ्यासक्रम चालवण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. त्या सर्व संस्थांनी कौशल्य विकास विभागाच्या विविध योजना अंतर्गत उमेदवारांना कौशल्य आधारित उत्कृष्ट प्रशिक्षण द्यावे व त्या उमेदवारांना अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विहित वेळेत नोकरी उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाच्या विविध योजनांच्या आढावा प्रसंगी जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त हनुमंत नलावडे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक योगेश वाघ, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कौशल्य विकास समन्वयक प्रशांत चोरमले, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर. बी. काटकर, सहाय्यक कामगार आयुक्त एस. एम. गायकवाड, उद्योजक अमित जैन, रविकिरण स्किल ट्रेनिंग चे सचिन लवंगी, सोलापूर महापालिकेचे कौशल्य विकासचे गणेश कोळी, समीर मुलांनी यांच्यासह अन्य सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद पुढे म्हणाले की, कौशल्याचे प्रशिक्षण देणाऱ्या सर्व संस्थांनी जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागात सुरू केलेल्या केंद्रामध्ये विविध कौशल्य आधारित अभ्यासक्रम व्यवस्थितपणे चालू ठेवावेत. प्रत्येक अभ्यासक्रमासाठी उत्कृष्ट दर्जाचे प्रशिक्षक नियुक्त करावेत. तसेच प्रशिक्षित झालेल्या उमेदवारांना विहित वेळेत १०० टक्के रोजगार(नोकरी) मिळाला पाहिजे यासाठी प्रयत्न करावेत. त्याप्रमाणेच ज्या उमेदवारांचे स्वतःचा उद्योग-व्यवसाय सुरू करण्याची इच्छा असेल त्या उमेदवारांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी मार्गदर्शन करावे व प्रशिक्षित उमेदवारांना मिळालेल्या रोजगाराच्या नोंदी कौशल्य विकासने उपलब्ध करून दिलेल्या संकेतस्थळावर अपलोड कराव्यात, अशा सूचना त्यांनी केल्या.

अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळा च्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत मागील चार वर्षात सोलापूर जिल्ह्यातील ६ हजार ५०९ लाभार्थ्यांची कर्ज प्रकरणे बँकांनी मंजूर केलेली दिसून येत आहेत, त्यापैकी ५ हजार ९४३ प्रकरणांमध्ये महामंडळाकडून व्याज परतावा मंजूर केलेला असून त्यासाठी ४६ कोटी ६९ लाख रुपये संबंधित लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. तरी जिल्ह्यात या महामंडळ अंतर्गत असलेल्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून मराठा समाजातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी मोठा वाव असून त्यासाठी महामंडळाचे जिल्हा समन्वयकांनी याबाबत स्वतंत्र बैठक जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करावी. त्यापूर्वी महामंडळ अंतर्गत बँकांनी रिजेक्ट केलेल्या किमान ५०० प्रकरणाचा अभ्यास करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल दिनांक १५ नोव्हेंबर २०२३ पर्यंत सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर अंतर्गत कौशल्य आधारित जे अभ्यासक्रम सुरू आहेत, त्याबाबतचे प्रमाणपत्र उमेदवारांना मिळवून त्यांना नोकरी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विकास केंद्रासोबत करार करण्यासाठी विद्यापीठाच्या वतीने एक स्वतंत्र प्रस्ताव पुढील पंधरा दिवसात सादर करावा, अशी सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केली. त्याप्रमाणेच कौशल्य विकास अंतर्गत काम करणाऱ्या प्रशिक्षण संस्थांमध्ये डिजिटल मार्केटिंग चा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी कौशल्य विकास विभागाच्या सचिवाशी चर्चा करून जिल्हास्तरावरून प्रस्ताव लवकरच पाठविण्यात येणार असून हा डिजिटल मार्केटिंग चा अभ्यासक्रम सुरू करून उद्योजकांना आवश्यक असलेले त्यातील तज्ञ उमेदवार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त श्री नलावडे यांनी कौशल्य विकास विभागाच्या विविध योजनांची माहिती बैठकीत दिली. यामध्ये किमान कौशल्य विकास कार्यक्रम, प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम, अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ कडील योजना, मॉडल करियर सेंटर आदीची माहिती दिली.

सकल मराठा समाज अक्कलकोट तालुक्याच्या वतीने मराठा आरक्षण करिता अक्कलकोट-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर रस्ता रोको आंदोलन

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट शहर व तालुक्यातील समस्त सकल मराठा समाजाच्यावतीने मराठा आरक्षण व मराठा योद्धा मनोज जरांगे-पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी गुरुवारी सकाळी ९.३० ते ११.३० वाजता अक्कलकोट-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर (रिलायन्स पेट्रोल पंप समोर) रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.अक्कलकोट तालुक्यातील शहर व ग्रामीण भागातील सर्व मराठा बांधवानी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सुमारे दीड ते दोन तास अक्कलकोट-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग बंद केल्याने २ ते ३ किलोमीटरपर्यंत दुतर्फा वाहनांची लांबच-लांब रांगा लागल्या होत्या.

एकच मिशन मराठा आरक्षण! मराठा समाजाच्या आरक्षण लढ्याकरिता अक्कलकोट तालुका व शहरातील समाज बांधवांनी एकत्रित येवून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लढत असलेले संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी सोमवारपासून साखळी उपोषणास प्रारंभ करण्यात आले असून चौथ्या दिवशी साखळी उपोषण सुरु आहे.याप्रसंगी सकल मराठा समाजाचे ज्येष्ठ नेते सुरेशचंद्र सुर्यवंशी, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, महेश इंगळे, अमोलराजे भोसले, बाबासाहेब निंबाळकर, प्रविण देशमुख, बाळासाहेब मोरे, संतोष फुटाणे, प्रा.प्रकाश सुरवसे, बाळासाहेब मोरे, प्रवीण घाटगे, ठाकरे गटाचे शिवसेना तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे, सुनील कटारे, विलासराव सुरवसे, निखिल पाटील, सोपानराव गोंडाळ, श्रीमती ताराबाई हांडे, माया जाधव, सुभाष गडसिंग, स्वामीराव सुरवसे, तम्मा शेळके, प्रदिप जगताप, मनोज निकम, कुमार सुरवसे, वैभव नवले, शितल जाधव, संजय गोंडाळ, प्रविण घाटगे, योगेश पवार, वैभव मोरे, चंद्रकांत सोनटक्के, प्रथमेश पवार, संतोष भोसले, पिटू साठे, आकाश शिंदे, सागर गोंडाळ आतिश पवार, मनोज गंगणे, गोटू माने, टिनू पाटील, राजेंद्र पवार, रणजित जाधव, ऋषिकेश लोणारी, भोसले, श्रीशैल कुंभार, समर्थ घाटगे, मैनुद्दीन कोरबु, महेश दणके, रवि कदम, अंकुश पवार, सुनिल पवार, गोविंद शिंदे, रोहन शिर्के, भरत राजेगावकर, महेश डिग्गे, दिनेश बंडगर, शुभम चव्हाण, अंकुश पवार, राजू माकणे, पवन पाटील, ज्योतीबा चव्हाण, स्वामीनाथ बेंद्रे, पिंटू मचाले, ओंमकार महाडिक, ज्ञानेश्र्वर पुजारी, किरण साठे, सुरेश कदम, नितीन शिंदे, अमित थोरात, नितीन शिंदे, किरण शिंदे, गोरखनाथ माळी, कल्याणराव देशमुख, सागर गोंडाळ, गिरीष पवार, राहूल इंडे, प्रकाश लोंढे, गणेश लांडगे यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

वंचित बहुजन आघाडी अक्कलकोट ,तालुक्याची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शहर व तालुका तसेच सर्व युनिट चे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक आज संपन्न झाली कंटेहल्ली येथे थेट सरपंच पदासाठी एससी प्रवर्गातून महिला राखीव जागेतून सौ लक्ष्मी लक्ष्मण शिंगे या वंचित बहुजन आघाडी पुरस्कृत उमेदवार म्हणून अर्ज भरलेला असून त्यांचा प्रचार वंचितच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी जोमाने काम करावे तसेच वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग खांडेकर महासचिव अमोल तेलंग व त्यांचे सर्व सहकारी यांच्या उपस्थितीत युवक आघाडी अक्कलकोट पदाधिकारी निवडीचा मुलाखतीचा कार्यक्रम या ठिकाणी करण्यात आला

तसेच या बैठकीमध्ये वंचित बहुजन आघाडी पदाधिकारी व कार्यकर्ते यांना पक्षाचे सभासद नोंदणी आपल्या परिवारासहित करण्याची सूचना देण्यात आली, व तसेच इतर अनेक विषय या बैठकीमध्ये चर्चा ला घेण्यात आला असून हा बैठक अत्यंत खेळीमेळी वातावरणात पार पाडला, वंचित बहुजन आघाडी युवा जिल्हाध्यक्ष श्री पांडुरंग खांडेकर व त्यांचे सर्व सहकारी यांचा सत्कार अक्कलकोट वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आला

तसेच वंचित बहुजन आघाडी पुरस्कृत उमेदवार सौ लक्ष्मी लक्ष्मण शिंगे यांचा सत्कार युवक आघाडी जिल्हाध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आला याप्रसंगी मोठ्या प्रमाणात सर्व पदाधिकारी शाखाध्यक्ष व कार्यकर्ते उपस्थित होते

पान मंगरूळ येथे मराठा समाज आरक्षणासाठी एकदिवसीय लक्षणीय उपोषण

एकदिवसीय साखळी उपोषण
एकच मिशन मराठा आरक्षण

अक्कलकोट/प्रतिनिधीः पान मंगरूळ येथे ग्रामपंचायत समोर मनोज जरंगे पाटील यांच्या समर्थनार्थ गावात व मुख्य बाजारपेठ येथून मराठा समाज यांच्या आरक्षणासाठी मोर्चा व एकदिवसीय लक्षणीय उपोषण करण्यात आला आहे.

पान मंगरूळ येथे ग्रामपंचायत समोर मनोज जरंगे पाटील यांच्या समर्थनार्थ मुख्य बाजारपेठ येथून मराठा समाज यांच्या आरक्षणासाठी मोर्चा व एकदिवसीय लक्षणीय उपोषण करण्यात आला आहे. यावेळी गावातील सर्व समाजातील लोक उपस्थित राहून मराठा समाजास आरक्षण देण्याबाबत पाठिंबा जाहीर केला आहे. व सरकारला चेतावणी देऊन सांगण्यात आला आहे. की येणाऱ्या काळात जर आपण मराठा आरक्षणास मंजुरी नाही दिली तर आम्ही सर्व समाजातील लोकांनी मोठा असा तीव्र आंदोलन व रास्ता रोको आंदोलन करणार आहोत असे यावेळी सांगण्यात आले. यावेळी गावातील सर्व समाजातील लोक उपस्थित होते.यावेळी मराठा समाजाचे ज्येष्ठ नेते राजू अण्णा पवार बाबुराव पवार सर सागर सुरवसे शाम कदम अशोक माने सतीश पवार माजी सरपंच लक्ष्मण पुजारी चिदानंद गायकवाड फारूक मुजावर बाबुलाल वरुर रवी बनसोडे डॉक्टर सागर हिप्परगी प्रकाश हिप्परगी व इतर समाजातील सर्व लोक उपस्थित होते.

उल्हासनगर - भगवान महर्षी वाल्मिकी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शहरातील ठिकठिकाणी भगवान महर्षी वाल्मिकी यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच उल्हासनगर शहरात ठिकठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.ङ्गउल्हासनगर कॅम्प क्रमांक तीन येथील मध्यवर्ती रुग्णालय मध्ये हि भगवान महर्षी वाल्मिकी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मध्यवर्ती रुग्णालय चे प्रमूख सिव्हिल सर्जन डॉ मनोहर बनसोडे उपस्थित होते

उद्योग व अर्थव्यवस्थेत इंजिनिअरिंगला अतिशय महत्वाचे स्थान

स्वेरीत 'डिझाइन, मॅनिफॅक्चरींग अँड टेस्ट ऑफ थ्री फेज डिस्ट्रीब्युशन ट्रान्सफार्मर' यावर कार्यशाळा संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधी : 'शिक्षणातून जीवन मार्ग निवडताना जे आवडीचं आहे त्याला प्राधान्य द्यावे. ते मिळाले तर उत्तमच, पण जर हुकले तर जे मिळाले आहे त्यावर निर्मळपणे प्रेम करून त्यात स्वत:ला झोकून द्यावे आणि यश निश्र्चित समजावे. दहावी- बारावी नंतर करिअरचा मार्ग निवडताना इंजिनिअरिंग हा सदा सर्वकाळ अतिशय उत्तम पर्याय राहिल्याचे या अगोदरच स्पष्ट झाले आहे. इतर कोणत्याही शाखेतून शिक्षण घेऊन बाहेर पडणारा पदवी अथवा पदविकाधारक याच्या तुलनेत इंजिनिअर्सना भविष्यात अमर्याद संधी उपलब्ध असतात. त्यामुळे उद्योग व अर्थव्यवस्थेत इंजिनिअरिंगचे स्थान अतिशय महत्वाचे आहे.' असे प्रतिपादन ट्रान्सफार्मर कंपनीचे संस्थापक नचिकेत कुलकर्णी यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग विभागात 'डिझाइन, मॅन्यूफॅक्चरींग अँड टेस्टींग ऑफ थ्री फेज डिस्ट्रीब्युशन ट्रान्सफार्मर' या विषयावर पाच दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. यात ट्रान्सफार्मर कंपनीचे संस्थापक नचिकेत कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करत होते. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली तसेच इलेक्ट्रीकल इंजिनिअरींगच्या विभागप्रमुख डॉ. दिप्ती तंबोळी यांच्या नेतृत्वाखाली व इतर प्राध्यापकांच्या सहकार्याने ही कार्यशाळा संपन्न झाली. दीपप्रज्वलनानंतर प्रास्ताविकात विभागप्रमुख डॉ.दिप्ती तंबोळी यांनी कार्यशाळेविषयी सविस्तर माहिती दिली. ट्रान्सफार्मर कंपनीचे संस्थापक नचिकेत कुलकर्णी हे पुढे म्हणाले की, 'अभियांत्रिकी मधील विद्यार्थ्यांनी कोअर संदर्भात शिक्षण घेतल्यानंतर त्यांना नवनवीन उदयोग व्यवसायात नोकरीच्या संधी मिळू शकतात. यासाठी विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी क्षेत्रात कठोर मेहनत करणे आवश्यक आहे.' ट्रेनींग विभागाचे अधिष्ठाता प्रा. अविनाश मोटे म्हणाले की, 'भविष्यात इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग क्षेत्रात नोकरीच्या खूप संधी असून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, रेल्वे, इलेक्ट्रिकल व्हेईकल कारखान्यातही ही रोबोटिक्स, ऑटोमेशन तसेच अनेक प्रशासकीय क्षेत्रात संधी निर्माण होणार आहेत.

कोरोना काळात देखील स्वेरीतून प्लेसमेंट विभागाच्या माध्यमातून कंपन्यामध्ये प्लेस होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रीकल इंजिनिअरींगचे परिपूर्ण ज्ञान अवगत करावे. या शाखेची पाळेमुळे इतर शाखांमध्येही पसरली आहेत. त्यामुळेच या अभियांत्रिकीच्या शाखेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग असे उच्चारताच डोळ्यासमोर येतात ते म्हणजे इलेक्ट्रिसिटी, इलेक्ट्रिक मशिन, इलेक्ट्रोमॅग्नेटिझम यासारखे शब्द. काळाबरोबर या शाखेची यशस्वी वाटचाल व विकास सुरू आहे.' असे सांगितले. या पाच दिवसात बेसिक ट्रान्सफार्मर पासून टाईप, रेटींग, मटेरियल रिक्वायर, वायंडिंग डिझाईन, कनेक्शन, बुशिंग, कुलिंग, आदी उच्च दर्जाच्या ट्रान्सफार्मर प्रोटेक्शन पर्यंत सर्व सविस्तर माहिती देण्यात आली.

यावेळी इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग विभागातील सर्व प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. समन्वयक म्हणून प्रा.डॉ. मोहन ठाकरे यांनी काम पाहिले. सुत्रसंचालन प्रा.रंजना खांडेभराड यांनी केले तर प्रा. सागर कवडे यांनी आभार मानले.

दुधनी जि.प.प्रा.मराठी शाळेस नविन शिक्षकांचे नियुक्ती करण्यात यावे: गोरखनाथ धोडमनी

जिल्हा परिषदेचे अजब कारभार तिने शिक्षक आठ वर्गाचे विद्यार्थ्यांना शिकते

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील जि प प्रा मराठी शाळा असून तीनच शिक्षक चक्क आठ वर्ग सांभाळतात. याकडे जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे दुर्लक्ष झाल्याने विद्यार्थ्यांची भवितव्य धोक्यात असल्याचे प्रतिपादन शाळा व्यवस्थापन समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष गोरखनाथ यांनी व्यक्त केली आहे.

अक्कलकोट पंचायत समितिचे गटविकास अधिकारी सचिन खड्डे व गट शिक्षणाधिकारी अरबाळ यांना निवेदन देऊन नविन शिक्षक नियुक्त करण्याचे मागणी केली आहे. या निवेदनावर शाळा व्यवस्थापन समितिचे अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी,सदस्य महेदिमिंया जिडगे व शिक्षणतज्ञ सैदप्पा झळकी यांच्या स्वाक्षरी आहे. महाराष्ट्र आणी कर्नाटकच्या सिमा भागात असलेल्या दुधनी हा गाव नगर परिषद व कृषि उत्पन्न बाजार समिती असलेल्या मोठ्या जनसंख्याचे गाव असून येथे जिल्हा परिषद मराठी शाळा आहे.याशाळेत पहिले ते चौथी पर्यंत शाळा शिकविले जातात.तर या शाळेत एकूण विध्यार्थ्यांचे पट संख्या २१४ असून शिक्षकांचे एकुण मंजूर पद १+८=९असून यात सद्या या शाळेचे शिक्षकाविना विध्यार्थ्यांचे गुणवत्ता ढासळत आहे. असे असताना एकूण आठ वर्गासहीत मुख्याध्यापकांची कामे फक्त तीनच शिक्षक करत असल्यामुळे आठ वर्गातील विद्यार्थ्यांना शिकवणे तीनच शिक्षकांना गैरसोय होत असल्याचे पालकामध्ये संबंधित शिक्षण विभागातील अधिकार्यांना नाराजी व्यक्त करत,शिक्षण विभागाच्या कारभारावर सर्वत्र नाराज व्यक्त केली जात आहे. गट शिक्षणाधिकारी,गट विकास अधिकारी,जिल्हा शिक्षणाधिकारी आणी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे शिक्षक मिळेपर्यंत आंदोलन व तक्रार करण्या येईल असे मत यावेळी निवेदनात म्हंटली आहे. त्यामुळे संबंधीत अधिकार्यांनी जातीने लक्ष घालून विध्यार्थ्यांचा शिक्षकाविना होणार्या गैरसोय दूर करण्यात यावे अशी मागणी केली आहे. याप्रसंगी अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी,सदस्य मिहिदिमिया जिडगे शिक्षणतज्ञ सैदप्पा झळकी सह रिपइं ता अध्यक्ष अविनाश मडिखांबे,अंबादास गायकवाड,राजु भगळे,निजप्पा गायकवाड,इरण्णा दसाडे, रमेश धोडमनी बाबु गायकवाड बबलाद,साखरेसह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी गोगांवच्या सरपंच वनिता सुरवसे यांनी दिले पाठींबा

सकल मराठा समाजाला सरसकट
आरक्षण मिळावे या मागणीसाठी
मराठा योध्दा

अक्कलकोट/प्रतिनीधीः सध्या महाराष्ट्रात मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मोठ्या प्रमाणात आंदोलन चालू आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणास पाठिंबा देण्यासाठी अक्कलकोट येथे सकल मराठा समाजाच्या वतीने साखळी उपोषणास सुरुवात करण्यात आली असून त्यास गोगांवच्या सरपंच वनिता सुरवसे यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे, त्या सोलापूर जिल्ह्याच्या सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र च्या जिल्हा समन्वयक आहेत.

सरकारने लवकर निर्णय न केल्यास जिल्ह्यातील सर्व सरपंच, उपसरपंच सदस्य यांचा मंत्रालयवर मोर्चा काढून निषेध करून ग्रामपंचायतीचे कामकाज बंद ठेवू असा इशाराच सरकारला सरपंच वनिता सुरवसे यांनी दिला आहे गावगाडा चालवणाऱ्यां सर्व सरपंचानी सुद्धा पाठिंबा द्यावा असे आव्हान सरपंच वनिता सुरवसे यांनी केले आहे.

जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप व उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्याकडून पाठिंब्याचे पत्र सकल मराठा समाजाचे शिष्ट मंडळ व वटवृक्ष देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्र्वस्त अमोल राजे भोसले, बाळासाहेब मोरे यांच्याकडे देण्यात आले आहे.यावेळी प्रवीण देशमुख, शशिकांत पाटील, सुनील सावंत, राज

यादव, शाम बाबर, प्रवीण घाटगे, मारुती शिंदे, यांच्या सह वागदरी जिल्हा परिषद गटातील मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

अक्कलकोट शहरात वाढत्या डेंग्यू आजाराला रोखण्यासाठी संपूर्ण शहरात जंतूनाशक फवारणी ची रिपाइं आठवले गटाची मागणी

महाराष्ट्र शासन
vivo X90 | ZEISS
Nov 2, 2023, 15:18

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट शहरात गेल्या काही दिवसांपासून डेंग्यू ची साथ पसरली आहे.अनेक नागरिकांना डेंग्यू ची लागण झाली आहे विषेश करून जे लहान बालक व वयोवृद्ध नागरिक यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी असल्याने त्यांना मोठ्या प्रमाणात डेंग्यू ची लागण होत आहे. या डेंग्यू मुळे अनेकांचे जीव ही गेले आहे त्यामुळे अक्कलकोट नगरपरिषदेने याची गंभीर दखल घेऊन लवकरात लवकर संपूर्ण शहरात जंतूनाशकाची फवारणी करावी. सकाळी व संध्याकाळी अशा दोन्ही वेळेस संपूर्ण शहरात जंतूनाशकाची फवारणी करावी जेणे करून नागरिकांना डेंग्यू आजाराची लागण होणार नाही व नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार नाही याची काळजी नगरपरिषदेने घ्यावी. येत्या दोन दिवसांत संपूर्ण अक्कलकोट शहरात जंतूनाशकाची फवारणी झाली नाही तर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने अक्कलकोट नगरपरिषदेसमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा रिपाइं तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे व शहर अध्यक्ष अजय मुकणार यांनी दिला.यावेळी रिपाइं जिल्हा चिटणीस सैदाप्पा झळकी, तालुका सरचिटणीस राजू सगळे, तालुका उपाध्यक्ष अंबादास गायकवाड,शहर सरचिटणीस शुभम मडिखांबे,मुस्लिम आघाडीचे सैपन युवक तालुका अध्यक्ष अप्पा भालेराव,शेख,लक्ष्मीपुत्र दसाडे,रोमित मडिखांबे,गोरख धोडमनी रमेश धोडमानी,श्रीकांत गायकवाड,अजय मडिखांबे,बाबू गायकवाड,दत्ता कांबळे,दस्तिगिर मुजावर,इत्यादी उपस्थित होते.

श्री रामेश्र्वर प्रासादिक मंडळ मिठबांव मुंबई लवकरच करणार श्री विठ्ठल रखुमाई समता मंदिराचा जीर्णोद्धार

इच्छुक देणगीदार यांना पुढे येण्याचे आवाहन...

ठाणेः श्री रामेश्र्वर प्रासादिक मंडळ मिठबांव मुंबई शाखा यांची सर्वसाधारण वार्षिक सभा नुकतीच छबिलदास हॉल दादर येथे मंडळाचे अध्यक्ष सुनील मांजरेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. मंडळाचे सचिव श्री. प्रवीण दळवी तसेच खजिनदार श्री गिरीश मयेकर यांनी अहवाल आणि जमाखर्च वाचून दाखवला.

जुनी होत चाललेली गावची श्री विठ्ठल रखुमाई मंदिराची वास्तू आता नव्याने बांधण्याचे जे काम हाती घेतले आहे त्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. कोकणातील सागर किनारी वसलेले देवगड तालुक्यातील मिठबांव गाव आणि या गावातून जाताना दिसणारे सुंदर असे श्री विठ्ठल रखुमाई समता मंदिर .स्थापना १९२२ जवळपास

१०० एवढी वर्षे इतिहास असलेली ही वास्तू प्रसिद्ध आहे ती दर वर्षी मार्गशीर्ष महिन्यात साजरा होणारा प्रसिद्ध हरिनाम सप्ताह सोहळा यामुळे गावातील शेतकरी वर्ग आणि मुंबईतील चाकरमानी यांनी एकत्र येऊन श्री विठ्ठल रखुमाई समता मंदिराची स्थापना केली आणि पाहता पाहता आषाढी एकादशी कार्तिकी एकादशी सप्ताह तसेच गावातील सांस्कृतिक कार्यक्रम रंगू लागले. पंचक्रोशीत नाव गाजू लागले. पंढरपूर ला न जाता येणाऱ्या भक्ताला जणू विठ्ठल येथेच दिसू लागला. पण आज ही वास्तू जुनी झाली आहे.तिथे नवीन मंदिर बांधण्याची गरज आहे.अशा परिस्थितीत स्थानिक गावकरी मंडळी व मुंबई त कार्यरत असणारी मंडळी यांच्या समन्वयाने चालणारे श्री रामेश्र्वर प्रासादिक मंडळ मिठबाव मुंबई हे पुढे सरसावले आहे.

प्रत्येक सभासद यथाशक्ती वर्गणी आणि देणगी जमा करत आहेत तर काहींची आर्थिक परिस्थिती बिकट असली तरी जमेल तशी मदत करत आहेत.सर्वांचा उत्साह पाहण्यासारखा आहे.

परंतु बांधकाम खर्च जास्त असल्यामुळे मंडळ तुम्हा वाचक वर्ग विठ्ठल भक्त इच्छुक देणगीदार यांना आवाहन करत आहे की तुम्हालाही श्री विठ्ठल रखुमाई चरणी मदत करायची असेल तर अध्यक्ष सुनील मांजरेकर ९९८७ १४९ ५२९ ,सचिव प्रवीण दळवी ८२९१ ४९६ ४९९ खजिनदार गिरीश मयेकर ९८६९ ४१० ४७३ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या महामोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रा मनोहर धोंडे सरांसारखे कणखर,अभ्यासु नेतृत्व मिळणे हे आपल्या वीरशैव लिंगायत समाजाचे महत्तम भाग्यच आहे.आज समस्त वीरशैव लिंगायत समाजासाठी अहोरात्र झटणारे नेतृत्व आपल्याला लाभले यांचा समस्त वीरशैव लिंगायत समाजाला अभिमान आहे.अशा खंबीर नेतृत्वाला होईल त्या माध्यमातून सहकार्य करणे हे समस्त वीरशैव लिंगायत समाजाचे कर्तव्य आहे.

रविकांत कुरे, अक्कलकोट तालुका उपाध्यक्ष शिवा वीरशैव संघटना

सोलापूर/महेश गायकवाड : हिंदू लिंगायत आणि इतर जाती उपजाती यांना ओबीसीच्या त्या त्या प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी दिनांक ३० ऑक्टोंबर २३ रोजी लातूर येथे काढण्यात शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्यावतीने काढण्यात आलेल्या महामोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिवा संघटनेचे माध्यमातून गेली २८ वर्षे वीरशैव लिंगायत समाजातील विविध जाती पोटजाती यांचा समावेश ओबीसीच्या त्या त्या प्रवर्गात समावेश करावा या मागणीला धरुन आंदोलने, मोर्चे, उपोषण, लाक्षणिक उपोषण, रस्ता रोको अश्या विविध लोकशाही मार्गाने आंदोलन करुन काही जाती उपजाती यांना त्या त्या प्रवर्गात समावेश करण्यास कायदेशीररीत्या शासनाला भाग पाडले. त्याचप्रमाणे वीरशैव लिंगायत समाजातील उर्वरित जाती पोटजाती यासाठी लातूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते या मोर्चाला वीरशैव लिंगायत समाजातील बहुसंख्य बंधुभगीनींनी स्वयंस्फूर्तीने आपली उपस्थिती दर्शवुन शासनाचे लक्ष वीरशैव लिंगायत समाजाचे नेतृत्व करणाऱ्या शिवा संघटनेच्या मागण्यांकडे केंद्रीत केले हे विसरता येणार नाही.हा भव्यदिव्य मोर्चा नियोजनबद्ध पद्धती आयोजन मा प्रा मनोहर धोंडे सरांचे नेतृत्वाखाली करण्यात आले असून लातुर जिल्हा तसेच इतर जिल्ह्यांतील पदाधिकारी यांनी या भव्यदिव्य मोर्चाला लाक्षणिक उपस्थित रहावी या करीता परिश्रम घेतले. हा मोर्चा कोणा एका वा एका गावातील वीरशैव लिंगायत बांधवांच्या हितासाठी नसुन महाराष्ट्रातील समस्त वीरशैव लिंगायत समाज बंधुभगीनींच्या मुलामुलींच्या भविष्यासाठी त्यांचे उन्नती साठी या वीरशैव लिंगायत समाजातील हिंदू लिंगायत आणि इतर जाती पोटजाती यांचा समावेश ओबीसी तसेच त्या त्या प्रवर्गातीलआरक्षणात करावा.

यापूर्वी पण वीरशैव लिंगायत समाजातील काही जाती पोटजाती यांना शिवा संघटनेच्या माध्यमातून ओबीसी आणि इतर प्रवर्गात समावेश करण्यात आला याचा आर्थिक फायदा बर्याच वीरशैव लिंगायत समाजातील शैक्षणिक, राजकीय आणि इतर क्षेत्रातील बंधुभगीनी यांना मिळाला हे नाकारता येणार नाही.

चलो लातूर..... चलो लातुर .....!
शिवा
अखिल भारतीय वीरशैव युवक
मोर्चा
: आमच्या प्रमुख मागण्या :

तसेच या लातूर महामोर्चाच्या माध्यमातून शासनाकडे विविध मागण्याचे निवेदन सादर केले आहे. त्या मागण्याची मा प्रा मनोहर धोंडे सरांचे नेतृत्वात पाठपुरावा शासनाकडे सुरुच राहणार आणि त्या मागण्यावर शासनाला सकारात्मक विचार करणे भाग पाडेल लवकरच समस्त वीरशैव लिंगायत समाजाला आपले न्याय हक्क मिळवून देण्यासाठी शिवा संघटना कटीबद्ध आहे. आमच्या वीरशैव लिंगायत समाजातील काही मंडळी फक्त लग्न जुळवाजुळव करण्यातच धन्यता मानतात तर काही श्रेय लाटण्यात मोठेपणा मानतात तर काही शिवा संघटनेच्याच मागण्या आपल्या लेटरहेड वर घेऊन शासनाकडे मागणी करीत असतात. शिवा संघटनेने गेली २८ वर्षे वीरशैव लिंगायत समाजातील विविध जाती पोटजाती यांचाच विचार करून त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्यात बहुतांश यश पण मिळालेच आहे.

शिवा संघटनेने कधीच वीरशैव वेगळे आणि लिंगायत वेगळे हि भुमिका घेतलेली नसुन समस्त वीरशैव लिंगायत समाजाला विविध क्षेत्रात न्याय मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला हे सत्य स्विकारावेच लागेल .

लातूर महामोर्चा साठी विविध जिल्ह्यांतील शिवा संघटनेचे पदाधिकारी, वीरशैव लिंगायत बंधुभगीनी यांनी अहोरात्र मेहनत घेतली हे या मोर्चाची भव्यता पाहून दिसुन येते त्यांची हि मेहनत कधीच वाया जाणार नाही हे त्रिवार सत्य आहे. या ठिकाणी एक महत्त्वाची गोष्ट नोंद घेण्यासारखी आहे ती म्हणजे वीरशैव लिंगायत समाजातील काही प्रमाणात जाणवलेली मानसिक नपुसकता म्हणा निष्क्रियता म्हणा किंवा त्यास आपण समाजाप्रती आपल्याला काही देणे घेणे नाही हि भावना...कारण लातूर महामोर्चा हा समस्त महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत समाजाचे उन्नती, विविध व्हावा समाजातील विविध घटकांना न्याय हक्क मिळावे या हेतूने आयोजित करण्यात आला होता महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत समाजातील विविध वाट्स अप ग्रुप वर , फेसबुकवर इतर माध्यमातून या महामोर्चाच्या आयोजना बद्दल सतत माहिती, आवाहन, मिटिंगा, अशा विविध माध्यमांतून पोस्ट, फोटो टाकण्यात आले होते परंतु काही मंडळींनी यात फक्त बघ्यांची भुमिका निभावली हे लक्षात घेणे आवश्यक आहे

वाढदिवसाच्या आणि इतर पोस्ट वर त्यांना लाईक करण्यासाठी त्यांना वेळ मिळतो पण समाजहिताच्या पोस्ट ला लाईक करायला त्यांची बोटे गारठतात आणि बुध्दी कुंठित होते परंतु जर याच मागण्या मंजूर झाल्या तर त्यांना फायदा होणारच ना ! मग साधे लाईक पण हि मंडळी करु शकत नाही याला काय म्हणावे ! अशांना दिलेली वरील उपमा हि योग्यच आहे. असो , आज नाही तर उद्या समाजातील प्रत्येक घटक हा जागा झालाच पाहिजे म्हणजेच समाज हा सक्षम आणि प्रबळ होईल यात शंका नाही आणि हेच महत्वाचे कार्य मा प्रा मनोहर धोंडे सरांचे नेतृत्वाखाली शिवा संघटनेच्या माध्यमातून होत आहे.

मोहोळ मतदार संघाचे यंदा चित्र बदलला मोहोळ मतदार संघातील शेकडो कार्यकर्त्यांनी राजू खरे यांना पाठिंबा

पंढरपूर/प्रतिनिधीः मोहोळ मोहोळ पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे संभाव्य उमेदवार राजू खरे यांच्या विजयासाठी मतदार मोहोळ आणि उत्तर सोलापूर भागातील अनेक युवक आता माणूस आतापासून तयारी लागली आहे याचाच एक भाग म्हणून पाच मतदारसंघातील शेकडो कार्यकर्त्यांनी रविवारी दुपारी तेरे परिसरात असलेल्या हॉटेल साई या ठिकाणी जंगी सत्कार करण्यात आला यावेळी छत्रपती राजश्री शाहू महाराज बहुसंस्थेच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले

यावेळी आपल्या सत्काराला उत्तर देताना उद्योजक राजू खरे म्हणाले की आपण मागील निवडणुकीपासून मोहोळ मतदार संघातून निवडणूक लढवण्यासाठी तयारी ठेवली होती ऐनवेळी पक्षाकडून आपल्याला थांबवले गेले परंतु यावेळी मात्र आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने ही निवडणूक लढणार असल्याचे सांगितले या निवडणुकी अनेक तुल्यबळ उमेदवार रिंगणात असणार आहेत परंतु आपण करीत असलेल्या कामाच्या जोरावर तसेच युवकाकडून आतापासून मिळत असलेल्या सात व विविध जाती धर्मातील लोकांकडून मिळत असलेल्या आशीर्वादाने मोहोळ मतदार संघातील शिवसेनेला मिळत असलेला मोठा पाठिंबा यामुळे आपण आगामी

विधानसभा सहजपणे विजयी होणार असल्याचे सांगितले

यावेळी शिवसेना मोहोळ विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष प्रकाश दादा पारवे शिवसेना उत्तर सोलापूर तालुका प्रमुख सुधीर गोरे शिवसेना जिल्हा सचिव जावेद पटेल शिवसेना उत्तर सोलापूर उपजिल्हाप्रमुख उमाकांत कारंडे शिवसेना मोहोळ तालुका उपप्रमुख कामर्स सोनवणे मानव परिवर्तन बहुउद्देशीय मागासवर्गीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विक्रम तेथे कोरवली समाजसेवा दादासाहेब भोसले चिंचोली काटीचे सरपंच राजेश पाटील प्रताप आलदर संदीप शेंडगे राम जाधव सौरभ शिंदे अमोल बोराडे नटराज पाटोळे पंकज भोसले वैभव गायकवाड राहुल घोरपडे उमेश चंदनशिवे अंबादास जाधव दिगंबर प्रशांत नायकवडी शरद लुंगीवाले लखन भिसे कृष्णा बोराडे नितेश माने वसंत होनमारे कृष्णा सूर्यवंशी मोहसीन फुलारी जमखंडी नवनाथ गावंडे सोनू दादा शिंदे यांच्या छत्रपती राजश्री शाहू महाराज भाऊ संस्थेचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते